Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-12(A)| December 2025

Original Article

# चंद्रगुप्त मौर्याचे भारतीय इतिहासातील योगदान

**डॉ. रमाकांत बबनराव गव्हाणे**
इतिहास विभाग प्रमुख, श्री. शरदचंद्रजी पवार वरिष्ठ महाविद्यालय, नारंगवाडी, ता.उमरगा जि.धाराशिव.
**Email:** gavhanerb2016@gmail.com

**Manuscript ID**:
JRD -2025-171202
ISSN: 2230-9578

Volume 17
Issue 12(A)
Pp. 7-10
December 2025

**Submitted:** 15 Nov. 2025
**Revised:** 25 Nov. 2025
**Accepted:** 10 Dec. 2025
**Published:** 31 Dec. 2025

***घोषवारा***

*चंद्रगुप्त मौर्य यांनी भारतीय उपखंडाचे पहिल्यांदाच राजकीय एकीकरण साधून, सुयोजित प्रशासनव्यवस्था, सुरक्षित सीमारेषा, आर्थिक समृद्धी आणि शिस्तबद्ध शासन रचना यांचा पाया रचला. त्यांच्या नेतृत्वाखाली मौर्य साम्राज्य केवळ एक भौगोलिक विस्तार नव्हे, तर भारतीय राज्यकलेचे, रणनीतीचे आणि सुशासनाचे प्रभावी नमुने निर्माण झाले जे पुढील शतकांतील राजकीय संरचना आणि भारतीय इतिहासाच्या दिशा निर्देशनाला निर्णायक ठरले.*

## प्रास्तावना

मौर्य राजवंशाच्या स्थापनेमुळे भारतीय इतिहासात एका नवीन युगाची सुरुवात झाली आणि त्याच्या स्थापनेचे श्रेय चंद्रगुप्त मौर्य यांना जाते. "एकाच शासकाच्या अधीन असलेल्या विशाल प्रदेशावर मौर्य साम्राज्याचे नियंत्रण असल्याने राजनैतिक व्यवस्थेत तुलनेने अधिक एकरूपता आली"[१]. यामुळे एका विशाल साम्राज्याची स्थापना झाली. भारतीय इतिहासातील प्रख्यात सम्राटांमध्ये चंद्रगुप्त मौर्य (इ.स.पू.322–298) यांचे स्थान अत्यंत मोलाचे मानले जाते. मौर्य साम्राज्याची स्थापना, भारतीय उपखंडात प्रथमच केंद्रीकृत राजसत्तेची निर्मिती, परकीय आक्रमणांचा प्रतिकार, आर्थिक-सामाजिक धोरणांचे पुनर्रचना, तसेच कौटिल्याच्या अर्थशास्त्राच्या तत्त्वांवर आधारित प्रशासन व्यवस्था ही त्यांची प्रमुख देणगी ठरली. त्यांचा कालखंड भारतीय उपखंडाच्या राजकीय एकात्मतेचा आरंभबिंदू मानला जातो.राज्य प्रशासनाचे एक मॉडेल स्थापित करून, त्यांनी या विशाल देशात स्थिर शासन स्थापित केले. परिणामी, दीर्घकालीन शांतता प्रस्थापित झाली, ज्यामुळे व्यापार, उद्योग, साहित्य आणि कला क्षेत्रात प्रगती झाली. भारताबाहेर भारतीय संस्कृती आणि धर्माचा प्रसार शांततेने सुरू झाला. शांतता, वैश्विक बंधुता आणि सांस्कृतिक सौहार्दाचे घटक जगभर पसरू लागले.

## संशोधन विषयाचे उद्धेश

१)चंद्रगुप्त मौर्य यांच्या राजकीय कार्याची माहिती घेणे.
२) चंद्रगुप्त मौर्याच्या प्रशासन व्यवस्थेची माहिती घेणे.
३) चंद्रगुप्त मौर्य यांच्या जीवन चरित्र याची माहिती घेणे.
४) चंद्रगुप्त मौर्य यांचे सामजिक, धर्मिक व आर्थिक सुधारणाची माहिती घेणे.

## १) चंद्रगुप्त मौर्य यांचे चरित्र:- (ईसापूर्व ३२१-२९८)

या गौरवशाली युगाचे प्रवर्तक आणि भारताचे संस्थापक व पहिला सम्राट चंद्रगुप्त मौर्य होता. मौर्य राजवंशाची स्थापना चंद्रगुप्त मौर्य यांनी केली होती, जे त्यावेळी सुमारे पंचवीस वर्षांचे होते. चंद्रगुप्ताच्या वंशाबद्दल वेगवेगळे वृत्तांत आहेत. "ब्राह्मण परंपरेनुसार, चंद्रगुप्ताचा जन्म नंदाच्या दरबारात मुरा नावाच्या शुद्र महिलेच्या पोटी झाला होता"[2] तथापि, "प्राचीन बौद्ध परंपरेनुसार, पहिले प्रजासत्ताक नेपाळच्या तराई प्रदेशातील पिपलीवन येथे अस्तित्वात होते.

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

**Address for correspondence:**
*डॉ. रमाकांत बबनराव गव्हाणे, इतिहास विभाग प्रमुख, श्री. शरदचंद्रजी पवार वरिष्ठ महाविद्यालय, नारंगवाडी, ता.उमरगा जि.धाराशिव*

**How to cite this article:**
*गव्हाणे, . रमाकांत . बबनराव . (2025). चंद्रगुप्त मौर्याचे भारतीय इतिहासातील योगदान. Journal of Research and Development, 17(12(A)), 7–10. https://doi.org/10.5281/zenodo.18182180*

Quick Response Code:

Website:
https://jrdrvb.org/

DOI:
10.5281/zenodo.18182180
OPEN ACCESS

परिणामी, हे पुष्टी करते की चंद्रगुप्त मौर्य क्षत्रिय वंशाचे होते"[३].त्या वेळी मगधवर नंद राजवंशातील धनानंद राज्य करत होता. तो अत्यंत क्रूर आणि संपत्तीचा लोभी होता. यामुळे तो जनतेत अलोकप्रिय झाला.

**२) चंद्रगुप्त मौर्याचे भारतीय इतिहासातील योगदान / कामगिरी:-**

**१. नंद साम्राज्याचा पराभव आणि नव्या सत्तेची स्थापना**

चंद्रगुप्त मौर्याने इ.स.पू.322 च्या सुमारास नंद घराण्याचा राजा धनांनंद याच्या सत्तेचा अंत करून मौर्य वंशाची स्थापना केली. चाणक्याच्या कौशल्यपूर्ण रणनीती, गनिमीकावा आणि राजनैतिक क्षमतेच्या आधारावर त्यांनी जनतेतील असंतोष संघटित करून एक नवे साम्राज्य उभे केले. ही घटना प्राचीन भारतातील एका मोठ्या राजकीय परिवर्तनाची सुरुवात होती. नंद वंशाचा राजा धनानंद याच्या क्रूरतेमुळे आणि संपत्तीच्या लोभामुळे त्याच्याविरुद्ध जनतेत असंतोष वाढला. त्या असंतुष्ट लोकांना सोबत घेऊन चंद्रगुप्त मौर्यने आपले सैन्यबळ वाढवायला सुरुवात केली आणि धनानंदविरुद्ध बंड करायला सुरुवात केली. त्यावेळी चंद्रगुप्त मौर्य यांना तक्षशिला येथील कौटिल्य नावाच्या ब्राह्मणाचा पाठिंबा मिळाला, ज्याचा नंद वंशाने दरबारात अपमान केला होता. कौटिल्य हा एक कुशल राजकारणी होता. कौटिल्यच्या मदतीने नंद वंशाचा नाश झाला.

चंद्रगुप्त मौर्य हा नंद राजांचा एक लष्करी अधिकारी होता."चंद्रगुप्त मौर्यने इ.स.पूर्व ३२२ मध्ये धनानंदचा वध केला आणि मगध राज्याचा ताबा घेतला. या विजयात त्याला कौटिल्यचे मार्गदर्शन मिळाले."[४] कौटिल्य हा चंद्रगुप्ताचा मार्गदर्शक आणि सिंहासन सुरक्षित करण्यासाठी आणि संरक्षित करण्यासाठी विश्वासू सल्लागार होता. नंद राजवंशाच्या नाशामुळे मगधवर मौर्य राजवंशाची स्थापना झाली. मगधवरील नियंत्रण हे नवीन राजवंश स्थापनेतील पहिले पाऊल होते. त्यावेळी त्याचे वय सुमारे २५ वर्ष होते.

**२. भारतीय उपखंडाचे राजकीय एकीकरण**

चंद्रगुप्तांच्या नेतृत्वाखाली मौर्य साम्राज्याचा विस्तार पंजाब, सिंध, गुजरात, बिहार, उत्तर प्रदेश, मध्य भारत आणि काही दक्षिणेकडील भागांपर्यंत पोहोचला. हे प्राचीन भारताच्या इतिहासात पहिल्यांदा साधलेले व्यापक राजकीय एकीकरण होते. यामुळे व्यापार, प्रशासन आणि संरक्षण या सर्व क्षेत्रांत समन्वय निर्माण झाला. चंद्रगुप्त मौर्याने अनेक प्रदेश आपल्या साम्राज्यात विलीन करून एक बलाढ्य सत्ता स्थापन केली व भारतीय उपखंडाचे एका साम्राज्याखाली एकीकरण करून एकछत्री राज्यकारभार केला. असे करणारा प्राचीन भारतातील पहिला एकमेव राजा ठरला.

**३. सुटसुटीत आणि संघटित प्रशासनव्यवस्था**

चंद्रगुप्तांनी केंद्रीय, प्रांतीय आणि स्थानिक अशा तीन पातळयांवर प्रशासनाचे सुयोग्य विभाजन केले. मंत्रिमंडळ, अमात्य, नगरिक अधिकारी, गुप्तहेर व्यवस्था आणि काटेकोर महसूल व्यवस्थेने राज्यकारभाराला शिस्त आणि वेग प्राप्त झाला.अर्थशास्त्राच्या आधारे निर्माण झालेली ही व्यवस्था भारतीय राजकीय विज्ञानातील एक मूळ नमुना आहे. चंद्रगुप्त मौर्य शासक झाल्यानंतर, "त्याने सिंधू नदीचा प्रदेश ग्रीकांच्या जुलूमातून त्वरित मुक्त केला आणि तो आपल्या राज्यात समाविष्ट केला. त्याने इ.स.पूर्व ३१७ मध्ये सिंधचा ग्रीक सेनापती सुदमास याचा पराभव केला आणि त्याला भारतातून हाकलून लावले. आणि सिंधला आपल्या साम्राज्यात समाविष्ट केले"[५]. त्यानंतर, त्याने सौराष्ट्र, महाराष्ट्र, विदर्भ, आंध्र प्रदेश जिंकला आणि म्हैसूरपर्यंतचा प्रदेश ताब्यात घेतला. जिंकलेल्या प्रदेशावर सुसंघटीत प्रशासन व्यवस्था लागू करून सुप्रशासन व्यवस्थेचा पाया घातला.

**४. लष्करसंघटना आणि राष्ट्रीय सुरक्षा**

चंद्रगुप्तांकडे जगातील सर्वात मोठ्या स्थायी सैन्यांपैकी एक सैन्य होते. पायदळ, घोडदळ, रथदल, हत्तीदल आणि गुप्तहेर दल यांच्या समन्वयामुळे साम्राज्य सुरक्षित आणि अभेद्य राहिले. अलेक्झांडरच्या मोहिमेनंतर उत्तर-पश्चिम भारतात निर्माण झालेल्या गोंधळाचा फायदा घेत चंद्रगुप्तांनी परकीय प्रभाव हटवून राष्ट्रीय सुरक्षा मजबूत केली. चंद्रगुप्ताने मौर्य घराण्याची सत्ता स्थापन केल्यानंतर परकीय आक्रमणांना रोखण्याचे काम केले. व भारतामध्ये एक स्थिर सत्ता स्थापन झाल्याने राजकीय, सामाजिक, व आर्थिक विकास घडून येण्यास मदत झाली. चंद्रगुप्त मौर्याच्या लष्करी संघटन कौशल्यामुळे भारतीय उपखंडाचे संरक्षण होण्यास मदत झाली.

**५. भारत–यवन (Greek) संबंधांमध्ये स्थैर्य**

चंद्रगुप्त मौर्य भारतात आपले साम्राज्य वाढवत असताना, पश्चिम आशियातील अलेक्झांडरचा सेनापती सेल्युकस निकेटर (विजेता) अलेक्झांडरच्या साम्राज्याचा वारस बनला होता. त्याने ग्रीकांचा प्रदेश परत मिळवण्यासाठी भारतावर हल्ला केला. पण त्यावेळी भारताची परिस्थिती वेगळी होती. एक शक्तिशाली साम्राज्य मौर्य सत्तेच्या रुपात अस्तित्वात आले होते. "त्याला इ.स.पू. ३०३ मध्ये सिंधू नदीच्या काठावर थांबवण्यात आले आणि त्याचा पराभव करण्यात आला. त्यावेळी एका कराराद्वारे काबुल, कंधार, हेरात आणि बलुचिस्तान हे चार प्रांत चंद्रगुप्ताला देण्यात आले. याशिवाय,आपल्या पुत्रीचा विवाह चंद्रगुप्त मौर्यच्या मुला सोबत करावा लागला. आणि त्याचा वकील मेगास्थेनिस याला चंद्रगुप्ताच्या दरबारात पटलीपुत्राला पाठवले"[६].

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-12(A)| December 2025

सेल्युकस निकेटरशी झालेल्या तहामुळे भारत आणि यवन जगातील संबंधांना नवे रूप मिळाले. या तहातून प्रदेशविस्तार, राजनैतिक मान्यता आणि राजघराण्यांतील विवाहसंबंध या तीनही गोष्टी साध्य झाल्या. मेगस्थनीझसारख्या ग्रीक राजदूतास पाटलिपुत्रात राहण्याची संधी मिळाली आणि भारताच्या प्रशासनाविषयी जगभर माहिती पोहोचली. मेगेस्थेनिसने इंडिका नावाचा ग्रंथ लिहिला. या ग्रंथामध्ये पाटलीपुत्र शहराची माहिती तसेच तत्कालीन सामाजिक, धार्मिक, राजकीय, प्रशासनिक माहिती इतर देशात गेल्याने भारताकडे बघण्याचा द्रष्टीकोन बदलला. याचे श्रेय चंद्रगुप्त मौर्याला जाते.

**६. आर्थिक सुधारणा आणि व्यापारवृद्धी**

चंद्रगुप्त मौर्याची सत्ता स्थापन झाल्यानंतर त्याच्या साम्राज्यात स्थिरता निर्माण झाली. रस्ते, नाणी, व्यापारमार्ग, बाजारनियमन आणि कृषी बळकटी यांच्या माध्यमातून चंद्रगुप्तांनी आर्थिक विकासाला चालना दिली. सिंचनव्यवस्था, शेतीविषयक नियम, कारखाने आणि हस्तकला यामुळे साम्राज्य आर्थिकदृष्ट्या समृद्ध बनले. राज्याने व्यापारावर नियंत्रण ठेवून महसूल वाढवला.चंद्रगुप्त मौर्याचे शेती धोरण केंद्रीकृत व नियोजनाधारित होते. जमिनीचे सर्वेक्षण करून करव्यवस्था निश्चित केली जात असे. सिंचनव्यवस्था, कालवे व जलसाठे उभारण्यावर भर दिला. शेतकऱ्यांना सुरक्षा, बियाणे व साधनांची मदत दिली. वसाहती वाढवून शेतीक्षेत्र विस्तारले आणि उत्पादनवाढीद्वारे राज्याच्या महसुलात स्थैर्य आणले.

**७. न्यायव्यवस्था आणि सामाजिक सुव्यवस्था**

चंद्रगुप्त मौर्याची न्यायव्यवस्था केंद्रीकृत, कडक आणि वेगवान होती. कौटिल्याच्या अर्थशास्त्राच्या मार्गदर्शनाखाली राजा सर्वोच्च न्यायाधीश मानला जात असे. प्रांत, जिल्हा व ग्रामस्तरी न्यायालये कार्यरत होती. फौजदारी, दिवाणी आणि व्यापारी प्रकरणांसाठी स्वतंत्र अधिकाऱ्यांची नेमणूक केली होती. गुप्तचर यंत्रणा न्यायप्रक्रियेला मदत करत असे. कठोर पण न्याय्य शिक्षांच्या आधारे कायदा-सुव्यवस्था राखली जात होती.चंद्रगुप्तांनी कठोर परंतु न्याय्य न्यायव्यवस्था उभारली. गुन्हेगारांवरील कारवाई, कार्यक्षम पोलीस व्यवस्था आणि गुप्तहेर प्रणालीमुळे अपराध नियंत्रण शक्य झाले. सामाजिक सुव्यवस्थेसाठी नियम, प्रथा आणि शासनाच्या नैतिक जबाबदाऱ्यांवरही भर देण्यात आला.

**८. जैन धर्माचा स्वीकार आणि अध्यात्मिक प्रवास**

कारकीर्दीच्या उत्तरकाळात चंद्रगुप्तांनी जैन धर्माचा स्वीकार केला आणि अहिंसा, संयम व तपश्चर्या यांचा मार्ग अंगीकारला. श्रवणबेलगोळ येथे त्यांनी सल्लेखना व्रताचे पालन करून समाधी प्राप्त केली. यामुळे भारतीय समाजात राज्यकर्त्यांच्या नैतिकतेचे महत्त्व अधोरेखित झाले.

चंद्रगुप्त मौर्यचे साम्राज्य हिंदुकश पर्वतापासून ते म्हैसूर पर्यंत पसरलेले होते. फक्त कलिंगचा देश मौर्य साम्राज्याबाहेर होता. जैन परंपरेनुसार, चंद्रगुप्त जैन धर्माचा अनुयायी होता. चोवीस वर्षे राज्य केल्यानंतर, त्याने राज्याचा त्याग केला, राज्य आपल्या मुलाला सोपवले आणि शांततेची दीक्षा घेतली. तो दक्षिणेकडे भिक्षू म्हणून राहून गेला. इ.स.पूर्व २९८ मध्ये श्रवणबेळगोळ येथे त्याचे निधन झाले.

**३) चंद्रगुप्त मौर्य यांच्या कार्याचे मूल्यमापन**

चंद्रगुप्त मौर्य हे भारतीय इतिहासातील सर्वाधिक परिवर्तनशील सम्राटांपैकी एक होते. त्यांनी विखुरलेल्या भारताला एकत्र बांधले, त्यांनी भारताला परकीय सत्तेपासून मुक्त केले, कणखर प्रशासनव्यवस्था निर्माण केली, आर्थिक स्वयंपूर्णता साधली आणि राजनैतिक धोरणांची प्रभावी परंपरा निर्माण केली. त्यांचे योगदान केवळ त्यांच्या काळापुरते मर्यादित नाही; भारतीय उपखंडातील राजकीय, सांस्कृतिक आणि प्रशासकीय विकासावर त्याचा दीर्घकालीन परिणाम दिसून येतो. भारतातील राष्ट्रनिर्मितीच्या प्रक्रियेचा प्रारंभ त्यांच्या साम्राज्याने केला, यामुळे ते भारतीय इतिहासातील 'पहिले एकत्रीकरण कर्ते' म्हणून गौरविले जातात.

चंद्रगुप्त मौर्य यांनी असे साध्य केले जे आजपर्यंत इतर कोणत्याही शासकाने साध्य केले नव्हते. तो संपूर्ण भारताचा एक शक्तिशाली शासक बनला. चंद्रगुप्त एक शूर योद्धा आणि मुत्सद्दी होता. "राजाचे सुख लोकांच्या सुखात असते आणि त्यांच्या समस्या राजाच्या समस्या राहतात. असे विधान चंद्रगुप्त मौर्य करत असत"७. भारताच्या पहिल्या स्वातंत्र्ययुद्धात चंद्रगुप्त विजयी झाला, त्याने सेल्युकस निकेटर सारख्या परदेशी लोकांना पराभूत करून त्यांना भारतातून हाकलून लावले. परिणामी, त्याने परदेशी आक्रमणकर्त्यांना रोखले. त्याने अनेक राज्ये आपल्या साम्राज्यात समाविष्ट करून एक शक्तिशाली साम्राज्य स्थापन केले. देशात शांतता आणि सुव्यवस्था प्रस्थापित केली. कालवे, रस्ते आणि उद्याने बांधून त्याने लोकांना सुविधा पुरवल्या.भारतीय इतिहासात चंद्रगुप्त मौर्य यांचे नाव एका शक्तिशाली साम्राज्याचे संस्थापक आणि एक प्रसिद्ध आणि कार्यक्षम प्रशासक म्हणून अमर आहे. युनानी आक्रमण आणि अत्याचारी नंद शासकांच्या अत्याचारामुळे त्रस्त असलेल्या मगधाच्या लोकांना चंद्रगुप्ताने दिलासा दिला. म्हणूनच चंद्रगुप्ताला "भारताचा मुक्तिदाता"

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-12(A)| December 2025

असेही म्हटले जाते.चंद्रगुप्त मौर्य हे एक तेजस्वी शासक, पहिल्या भारतीय साम्राज्याचे निर्माते, कुशल मुत्सद्दी आणि जगप्रसिद्ध शासक म्हणून भारतीय इतिहासात नेहमीच अमर राहतील.

**संदर्भग्रंथ सुची**

1. रोमिला थापर - भारताचा इतिहास, राजकमल प्रकाशन, नवी दिल्ली: प्रथमावृत्ती, २००८, पृष्ठ क्र. ६१
2. आर. एस. शर्मा . (संपा. वासंती फडके)- एन्शंट इंडीया - 'के ' सर पब्लीकेशन, पुणे प्रथमावृत्ती, २००१,पृ. क्र.-१४४.
3. प्रा. रं. ना. गायधनी- प्राचीन भारताचा इतिहास' - 'के ' सागर पब्लीकेशन, पुणे. प्रथमावृत्ती,२००१, पृ.क्र. १५५.
4. रोमिला थापर - भारताचा इतिहास - पृष्ठ क्र..६१
5. प्रा. रं. ना. गायधनी - प्राचीन भारताचा इतिहास-पृ.क्र. १५४.
6. रोमिला थापर - भारताचा इतिहास - पृष्ठ क्रमांक ६२.
7. आर.एस. शर्मा आहेत - अँटीएंट इंडिया - पृष्ठ क्रमांक १४५
8. डॉ. के. के. शर्मा - भारतीय इतिहास - उपकार प्रकाशन, आग्रा, प्रथमावृत्ती,२००२. पृष्ठ क्रमांक १८९.